N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** धरणगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0119 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/03/2025 17:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 22/03/2025

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/03/2025

**Time From (वेळेपासून):** 11:45 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/03/2025 **Time (वेळ):** 16:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 017

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/03/2025 16:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एरंडोल - धरणगांव रस्त्यावरील,मुसळी फाट्या जवळ हटेल स्वराज , मुसळी, ता धरणगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): समाधान सुखा कोळी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खर्दे ख्रु, ता धरणगाव ,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खर्दे ख्रु, ता धरणगाव ,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9130299569

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नितीन भिमराव ब्राम्हणे | | | 1. 28,3 गट नं 94/2ऐ/1/2 , खोटे नगर, ,जळगांव,जळगांव तालुका,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यावेळी आम्ही पो.ठा.अ. पो.हे.कॉ. 3317 नितीन पाटील दे नोंद करतो की,अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये ची लेखी फिर्याद पोलीस स्टेशनला हजर केल्याने मा. पोलीस निरिक्षक धरणगांव पोलीस स्टेशन यांच्या आदेशाने खालीलप्रमाणे गुन्हा रजी.दाखल करीत आहोत.

1) धरणगाव पो.स्टे. गुरनं. /2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे

2) मुळ तकारदार व फिर्यादी - समाधान सुखा कोळी, वय 37 वर्ष, धंदा - शेती, रा. खर्दे खु., ता. धरणगाव, जि जळगाव

3) आलोसेचे नांव पत्ता - नितीन भिमराव ब्राम्हणे, वय 37 वर्ष, ग्रामसेवक, खर्दे ब्रु. ता. धरणगांव (खाते जिल्हा परिषद, ग्रामविकास विभाग वर्ग – 3) मुळ रा. 75ब, सेवकराम नगर, डिमार्ट रोड, नंदुरबार ह.मु. प्लॉट नं. 28, गट नं. 94/2ऐ/1/2 खोटे नगर, जळगांव

4) गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण – दि. 22.03.2025 रोजी 11.45 वा. सुमारास एरंडोल - धरणगांव रस्त्यावरील मुसळी फाटया जवळ असलेल्या हॉटेल स्वराज टपरीचे माघे आडोश्याच्या ठिकाणी

5) लाचेची मागणी रक्कम - 25,000/- रु.

6) स्विकारली रक्कम – 25,000/- रूपये (त्यात 500, 200, 100 रु दराच्या एकाच नंबरच्या 10 नकली नोटा)

सापळा व तपास अधिकारी - योगेश ठाकुर, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

7) गुन्हयाची थोडक्यात हकीगत - यातील तक्रारदार यांनी खुर्दे ब्रु. गावी कॉक्रींट गटार बांधण्याचे 2,00,000/- रु. चे व गावहाड बांधण्याचे 70,000/- रु. असे एकुण 2,70,000/- रु. ची दोन कामे केलेली आहे. त्यापैकी त्यांना कॉक्रींट गटार बाधण्याच्या कामाचा 1,95,000/- रु. चा व गावहाड बांधण्याचा कामाचा 69,000/- रु. चे असे एकुण 2,64,000/- रुपयाचे दोन चेक आलोसे यांच्या कडुन काहि दिवसापुर्वी मिळालेले आहे सदरचे दोन्ही चेक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन आलोसे यांनी तक्रारदार यास दि. 21/803/2025 रोजी फोन करुन सदर रक्कमेचा 10 टक्के प्रमाणे 25,000/- रु. लाचेची मागणी केली होती. तसेच तक्रारदार यांचा मित्र कुणाल किशोर इंगळे रा. साळवा, ता. धरणगांव यास देखील फोन करुन तक्रारदार यांना पैसे देण्याविषयी कळविले होते. बाबत तक्रारदार यांनी ला.लु.प्र.वि. जळगांव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती. सदर लाच मागणी तक्रार ची दि. 22/03/2025 रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता तक्रारदार यांनी खर्दे ब्रु. गावी बांधलेल्या कॉक्रींट गटार व गावहाड बांधण्याचे दोन्ही कामाचे एकुण 2,64,000/- चे दोन चेक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे 25,000/- रु. लाचेची मागणी करुन लाच रक्कम देणे संदर्भात तक्रारदार यांचे मित्र कुणाल किशोर इंगळे यास फोन करुन तक्रारदार यांच्या सोबत बोलणे करुन होते. त्यानंतर झालेल्या यशस्वी सापळा कारवाई दरम्यान 11.45 वा. च्या सुमारास एरंडोल - धरणगावं रस्त्यावरील मुसळी फाटया जवळ हॉटेल स्वराज टपरी मागे आडोश्याच्या ठिकाणी वर नमुद आलोसे यांनी तक्रारदार यांच्या कडुन खर्दे ब्रु. गावी कॉक्रींट गटार व गावहाड बांधण्याचे करण्यात आलेल्या 2,64,000/- रु. च्या कामाचे दोन चेक काढुन दिल्याचे मोबदला म्हणुन सदर रक्कमेचा 10 टक्के प्रमाणे 25,000/- रु. लाच रक्कम पंचा समक्ष स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा. सोबत टंकलिखीत केलेली फिर्याद जोडली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Santosh Kashinath Pawar
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन
जि.जळगाव

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): Pavankumar Pratapı
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH

(त्यांना झाल्यास) ..........................

फिर्याद

धरणगाव पो.स्टे.
दिनांक २२.०३.२०२५

मी समाधान सुखा कोळी,वय ३७ वर्ष,धंदा शेती, रा.खर्दे खुर्द,ता.धरणगाव,जि जळगाव मो.नं. ९१३०२९९५६९.

समक्ष फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व शेती करतो. तसेच मी ग्रामपंचायत खर्दे बुद्रुक, ता.धरणगाव येथे सदस्य देखील आहे. १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायतला गावच्या विकासकामांसाठी निधी प्राप्त होतो. त्या अंतर्गत मी मागील ३ महिन्यांपुर्वी खर्दे बुद्रुक गावी कॉक्रीट गटार बांधण्याचे २,००,०००/—रुपयांचे व गावहाळ बांधण्याचे ७०,०००/—हजार रुपयांचे असे एकुण २,७०,०००/—रुपयांची २ कामे केलेली आहेत. त्यापैकी मला कॉक्रीट गटार बांधण्याचे कामाचा १,९५,०००/—रुपयांचा व गावहाळ बांधण्याचे कामाचा ६९,०००/—रुपयांचे असे एकुण २,६४,०००/—रुपयांचे २ चेक खर्दे बुद्रुक ग्रामपंयाचयतचे ग्रामसेवक ब्राम्हणे यांचेकडुन काही दिवसांपुर्वी मिळाले आहेत.

दि.२१.०३.२०२५ रोजी ग्रामसेवक ब्राम्हणे यांनी मला फोन करुन वर नमुद प्रमाणे दोन्ही कामांचे २,६४,०००/—रुपयांचे २ चेक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन माझेकडे सदर रकमेच्या १० टक्के प्रमाणे २५,०००/—रुपयांची लाचेची मागणी केली होती. तेव्हा मी त्यांना ‘‘तुम्हाला उद्या मुसळी फाटयाजवळ येवून भेटतो’’ असे सांगितले होते. त्यानंतर मला माझा मित्र कुणाल किशोर इंगळे,रा.साळवा,ता.धरणगाव याने देखील फोन करुन सांगीतले की, त्यास काल दि.२१.०३.२०२५ रोजी ग्रामसेवक ब्राम्हणे यांचा फोन आला होता. त्यांनी मला कॉक्रीट गटार व गावहाळ बांधण्याचे कामाचे २ चेक काढुन दिले म्हणुन पैसे देण्यासाठी सांगत असल्याचे कळवले होते. सदर लाचमागणी प्रकारा बाबत मी मित्र कुणाल इंगळे याचेशी चर्चा करुन ग्रामसेवक ब्राम्हणे यांचे विरुध्द तक्रार देण्याचे ठरवले आहे. सदर लाचमागणी प्रकारा बाबत मी पोलीस उप अधिक्षक योगेश ठाकूर,लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगाव यांचेकडे दि.२२.०३.२०२५ रोजी तक्रार लिहुन दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उप अधिक्षक ठाकूर यांनी लाचेची पडताळणी करण्याचे ठरवुन मला व पंच श्री.पावरा यांना आवश्यक त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालु करून, माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन दिले. त्यानंतर मी ग्रामसेवक ब्राम्हणे यांना फोन करुन, फोनचा स्पिकर चालु करुन ‘‘कुठे आहे आप्पा’’ असे विचारले असता त्यांनी मला मुसळी फाटयावर येत आहे. तेव्हा मी त्यांना मुसळी फाटयावरील टपरी जवळ येतो असे सांगुन फोन कट केला होता. सदरचा फोन कॉल हा व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला आहे.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक ठाकूर यांनी मला व पंच श्री.पावरा अशांना माझे कडील मोटर सायकलने ग्रामसेवक ब्राम्हणे यांची भेट घेण्यासाठी १०.४० वाजेचे सुमारास मुसळी फाटयाजवळील टपरी जवळ पाठविले होते. त्याप्रमाणे मी व पंच श्री.पावरा अशांनी सदर ठिकाणी जावुन ग्रामसेवक ब्राम्हणे यांची भेट घेतली. तेव्हा आमच्यामध्ये खर्दे बुद्रुक गावी कॉक्रीट गटार बांधण्याचे गावहाळ बांधण्याचे प्रकरणा बाबत चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान त्यांना काही कमी जास्त करा असे म्हटलो असता त्यांनी मी बरोबर सांगीतले आपले २७ होता मी २५ सांगीतले, तुम्ही आपले माणस आहेत असे सांगुन, मी वर प्रमाणे केलेल्या दोन्ही कामांचे १० टक्के प्रमाणे २५,०००/— रुपये लाच रक्कमेची मागणी केली. व माझा मित्र कुणाल इंगळे यास फोन करुन, फोनच्या स्पिकर ऑन केला करुन, आम्ही मुसळी फाटयावर असल्याचे सांगीतले. तेव्हा कुणाल इंगळे यांनी त्यांना ‘‘तुम्ही तुमचे काम करुन घ्या मी अर्ध्या तासाने पैसे आणुन देतो’’ असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना तुम्ही नाश्ता करा मी येतो अर्ध्या तासाने येतो’’ असे सांगुन पंच श्री. पावरा यांचे सोबत सापळा पथका जवळ परत आलो. व घडलेली हकीकत सापळा पथकास सांगितली. त्यानंतर सापळा पथकाने माझे व ग्रामसेवक ब्राम्हणे यांचेमधील संभाषण ऐकुण लाच मागणी बाबत खात्री केली.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक ठाकूर यांनी मला २५,०००/—रु. हजर करण्यास सांगितले. तेव्हा मी माझे घर खर्चातुन आणलेले २०,०००/—रु. त्यात २००/—रु. दराच्या १०० चलनी नोटांचे बंडल पोलीस उप अधिक्षक ठाकूर यांचे समक्ष हजर करुन, सध्या माझे जवळ सध्या

धरणगाव पो.स्टे. गुरनं. ११९/२५ भ्र.प्र.अ. कलम ७ ... दि. २२/०३ १६४५ वाजता

ठाणे अंमलदार धरणगाव पोलीस स्टेशन जि.जळगाव

एवढेच पैसे असल्याचे कळविले. तेव्हा त्यांनी सापळा कारवाई साठी उर्वरित ५,०००/—रु. रकमेसाठी त्यांचे कडेस उपलब्ध असलेल्या भारतीय बच्चोंका बँक नावाच्या ५००/—रु. दराच्या एकाच नंबरच्या १० नकली नोटा वापरण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा पथकातील एका कर्मचाऱ्याने सदर नोटा एकत्रीत करुन त्यांना अँन्थ्रासीन पावडर त्या  माझे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशयात ठेवुन देण्यात आल्या.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक ठाकूर यांनी मला व पंच श्री.पावरा यांना आवश्यक त्या सुचना देवुन,व्हाईस रेकॉर्डर चालु करून,माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन दिले. त्यानंतर मी ग्रामसेवक ब्राम्हणे यांना फोन करुन, फोनचा स्पिकर चालु करुन ''कुठे आहे आप्पा'' असे विचारले असता त्यांनी मला मुसळी फाटयावर आहे. तेव्हा मी त्यांना मुसळी फाटयावरील टपरी जवळ येतो असे सांगुन फोन कट केला होता. सदरचा फोन कॉल हा व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला आहे.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक ठाकूर यांनी मला व पंच श्री.पावरा अशांना माझे कडील मोटर सायकलने ग्रामसेवक ब्राम्हणे यांची भेट घेण्यासाठी ११.३५ वाजेचे सुमारास मुसळी फाटयाजवळील टपरी जवळ पाठविले होते. त्याप्रमाणे मी व पंच श्री.पावरा अशांनी सदर ठिकाणी जावुन ग्रामसेवक ब्राम्हणे यांची भेट घेतली. तेव्हा मी त्यांना २५ हजार देतो मी पुढच्या कामाला कमी जास्त करुन घ्या असे बोलुन, मी माझे शर्टचे खिश्यात ठेवलेली २५,०००/— रुपये लाच रक्कम काढुन ग्रामसेवक ब्राम्हणे यांचे समोर धरली असता त्यांनी सदर लाच रक्कम त्यांचे उजव्या हातात स्विकारुन, त्यांचे हातात घेवुन मोजण्यास सुरवात केली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझे खिश्यातील हात रुमाल काढुन, माझे हातात धरुन ठेवुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने सदर ठिकाणी येवुन ग्रामसेवक ब्राम्हणे यांना लाच रक्कमेसह रंगेहात पकडुन त्यांना ताब्यात घेतले. तेव्हा पोलीस उप अधिक्षक ठाकूर यांनी त्यांना त्यांचे पुर्ण नाव,पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव नितीन भिमराव ब्राम्हणे,वय ३७ वर्षे, ग्रामसेवक, खर्दे बुद्रुक,ता.धरणगाव (खाते जिल्हा परिषद,ग्रामविकास विभाग, वर्ग ३) मुळ रा.७५ ब सेवकराम नगर, डी मार्ट रोड,नंदुरबार. ह.मु. प्लॉट नं.२८, गट नं.९४/२ ए/१/२ खोटे नगर,जळगाव असे सांगीतले. तसा संपुर्ण सापळा कार्यवाहीचा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी नितीन भिमराव ब्राम्हणे,वय ३७ वर्षे, ग्रामसेवक, खर्दे बुद्रुक ग्रामपंचायत,ता.धरणगाव यांनी मला मी खर्दे बुद्रुक,ता.धरणगाव येथे कॉक्रीट गटार बांधण्याचे कामाचा १,९५,०००/— रुपयांचा व गावहाळ बांधण्याचे कामाचा ६९,०००/—रुपयांचे असे एकुण २,६४,०००/—रुपयांचे दोन चेक काढुन दिल्याचा मोबदला म्हणुन सदर रकमच्या १० टक्के प्रमाणे माझेकडे २५,०००/—रूपये लाच लाच रक्कमेची मागणी करुन, सदरची लाच रक्कम दि.२२.०३.२०२५ रोजी ११.४५ वाजेचे सुमारास माझेकडुन एरंडोल—धरणगाव रत्यावरील मुसळी फाटयाजवळ असलेल्या हॉटेल स्वराज टपरीचे मागे आडोशाचे ठिकाणी स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील टंकलिखीत फिर्याद मी स्वतःवाचुन पाहीली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर असुन व खरी आहे.

समक्ष

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

ही फिर्याद दिली,
सही,दि.२२.०३.२०२५